<u>**सं.फौ.ख.क्रं.८९३/२०२१**</u>

शासन वि. नाना विठठल

<u>**नि.क्रं. २४**</u>

सरकारतर्फे साक्षीदार क्रं.६ ची साक्ष शपथेवर सुरु

| | | |
|---|---|---|
| नाव | – | दयानंद अमृता खराडे |
| वय | – | ४९ वर्षे, |
| व्यवसाय | – | शेती |
| राहणार | – | कापरेवाडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |

<u>**सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एन. आर. वाघ यांच्यामार्फत शपथेवर सुरूः–**</u>

दि. ०५/०३/२०२१ रोजी मला पो.हे.कॉ. श्री. एस. एन. शेख यांनी कापरेवाडी ते कर्जत रोडवर नेवसे वस्तीजवळ जबाब घेण्यासाठी बोलवले होते. माझ्यासमोर घटना घडली त्यावेळेस मी तेथे उपस्थित होतो. त्याठिकाणी आजिनाथ बाबुराव आले होते. न्यु हॉलंड ट्रॅक्टर हा पाठीमागून येऊन भगवान बाबुराव मंडलिक यांना धडकला, ते जागेवर मयत झाले. ट्रॅक्टर ड्रायव्हर हा नाना विठ्ठल लोखंडे होता. तो आज न्यायालयात हजर आहे. भगवान मंडलिक कापरेवाडीकडे चालले होते, पाठीमागून ट्रॅक्टरने धडक दिली. रस्ता मोठा डांबरी होता. त्याठिकाणी ट्रॅक्टर ड्रायव्हरची चुक होती. घटना घडल्यानंतर दुसऱ्या दिवशी पोलीसांनी मला बोलवले होते. त्याठिकाणी शेख साहेब आले व त्यांनी रक्त वगैरे पाहून जबाब घेतले. नेवसे वस्तीजवळ घटना घडली. माझे शिक्षण १० वी झाले आहे. घटनास्थळाच्या उत्तरेला नेवसे यांची घरे होती, पुर्व–पश्चिमेला घरे होती. साक्षीदार पुन्हा सांगतो की, पुर्व–पश्चिमेला कर्जत कापरेवाडी रस्ता होता. घटनास्थळाच्या दक्षिणेसदेखील नेवसे यांची घरे होती. ट्रॅक्टर न्यु हॉलंड कंपनीचा निळा ट्रॅक्टर होता. त्याला डबल ट्राली होती. भगवान मंडलिक हा सायकलवर कापरेवाडीकडे जात असताना ट्रॅक्टरने पाठीमागून धडक दिली. धडक दिल्यानंतर ते खाली पडले व त्यांना चक्कर आली, त्यांच्या शरिरातून रक्त निघत होते. मी ड्रायव्हरला थांबवले, तो पळून जात होता. मंडलिक यांची सायकल रस्त्यावर पडली होती. सायकलला दुधाचे कॅन होते. दुसऱ्या दिवशी पोलीसांनी सकाळी ८ ते ८.४५ वाजता मला बोलवले होते. पोलीसांनी माझी सही घेतली होती. मी पंचनाम्यावर सही केली होती. पंचनामा ८ वाजता सुरु झाला होता व ८.४५ वाजता संपला. त्यावेळी माझ्यासोबत दुसरा पंच कोंडिबा मारुती धनवटे होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात येत आहे. तो नि.क्र.१४ वर आहे. त्यातील मजकुर बरोबर

आहे. आरोपीने अपघाताच्याठिकाणी मदत केली नाही. तसेच घटनेबद्यल आरोपीने पोलीसांना खबर दिली नाही.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. एन. एस. खरात यांच्यामार्फतः–</u>**

२. खबर देण्यापुर्वी खबर देणाऱ्या व्यक्तीला मी वाहनाबद्यल व आरोपीबद्यल सांगितले होते. मी पोलीसांना दिलेला जबाब वाचून पाहिला नाही. त्या जबाबात काय लिहीले होते हे मी वाचून पाहिले नाही. हे खरे नाही की, पोलीसांनी अगोदर जबाब तयार करुन ठेवला होता व मी त्यावर फक्त सही केली. हे खरे आहे की, पोलीसांनी माझा फक्त जबाब घेतला.

**प्रश्नः** तुमच्या जबाबव्यतिरीक्त पोलीसांनी इतर काहीएक केले नाही ?

**उत्तरः** माझा जबाब घेतला व आणखी दुसऱ्या साक्षीदाराचा जबाब घेतला.

**प्रश्नः** पोलीसांनी फक्त जबाब घेतला दुसरे काही केले नाही ?

(सदर प्रश्नाचा साक्षीदार कोणतेही उत्तर देण्यास तयार नाही) कालांतराने साक्षीदार त्याच्या जबाबावर सह्या घेतल्याचे सांगत आहे.

**प्रश्नः** जबाबवर सह्या पोलीस स्टेशनला केल्या ?

**उत्तरः** घटनास्थळी केल्या.

घटनास्थळी मला श्री. धनवटे यांनी जबाब आहे म्हणून सांगितले होते. दि. ०४/०३/२०२१ रोजी जबाब असल्याचे मला धनवटे यांनी सांगितले होते. त्याने मला सकाळी ०७.०० वाजता असे सांगितले होते. मी सांगितलेल्या दिवशीच ०८.०० वाजता जबाबाला गेलो होतो. त्यादिवशी आम्ही दोघांनी सह्या केल्या होत्या. हे खरे नाही की, त्यानंतर पोलीसांनी केव्हाही सह्या घेतल्या नाहीत. त्यानंतर पोलीसांनी पोलीस स्टेशनला माझ्या सह्या घेतल्या होत्या. ५ तारखेला पोलीसांनी माझ्या सह्या घेतल्या होत्या. त्या सह्या धनवटे व माझ्या घेतल्या होत्या. पोलीसांचा व माझा वाद नाही. पोलीसांनी काय जबाब घेतला तो मी वाचून पाहिला होता. आता मला नि.क्र.१४ वरील पंचनामा दाखवला. याच जबाबावर माझी सही पोलीसांनी घेतलेली आहे व तो तोच जबाब आहे. हे खरे आहे की, नि.क्र.१४ खालील जबाबामध्ये ड्रायव्हरने माझ्यासमोर धडक दिली, तो पळून जात होता आणि मी त्याला धरले असे नमुद नाही. याचे कारण मला सांगता येत नाही. हे खरे नाही की, श्री मंडलिक व श्री धनवटे यांच्या सांगण्यावरुन व ते सह्या कर म्हणले म्हणून मी सह्या केल्या. हे खरे नाही की, श्री मंडलिक व श्री धनवटे हे माझे नातेवाईक आहेत. हे खरे आहे की, श्री. धनवटे व मंडलिक आम्ही एकाच गावाचे आहेत. हे खरे

नाही की, घटनास्थळाचे मी वर सांगितलेले वर्णन व घटनास्थळावर मी सही केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, माझ्या सरतपासणीत सांगितलेला मजकुर मी खोटा सांगितलेला आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.09.02 17:57:39 +0530

(आर. बी. राऊत)

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कर्जत.

दिनांकः ०२/०९/२०२५. (न्यायालय क्र. २)